MHSO100007792024

## स्पेशल दरखास्त क्र.२५/२०२४ मधील निशाणी क्र.२६ खालील आदेश.

न्यायनिर्णीत ऋणकोने सदरचा अर्ज रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द हुकूमनामाधारकाने दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम–२१, नियम–३७ अन्वये जी कार्यवाही सुरु केली आहे ती रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. त्याने सदरचे अर्जात कथन केले आहे की, सदरचे प्रकरणातील हुकूमनामा हा रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द वैयक्तीक कक्षेत झालेला नाही. सदरचा हुकूमनामा हा सहकारी संस्थेच्या म्हणजेच शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर यांच्याविरुध्द झालेला आहे. सदरचे कारखान्याचे इतर संचालक सोडून अध्यक्ष यांच्याविरुध्द सदरची कार्यवाही का करण्यात येत आहे, याबाबत हुकूमनामाधारकाने मुळ अर्जात काहीही कथन केले नाही व न्यायालयाने सुध्दा नि.क्र.०९ वरील आदेशात त्याबाबत काहीही उल्लेख केलेला नाही. न्यायनिर्णीत ऋणको याने सदरचे प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, कलम–४७ अन्वये चौकशी करण्याकरीता अर्ज दिला आहे परंतु त्याप्रमाणे कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. वास्तविक रविंद्र दिगंबर ओव्हाळ हे शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदशिवनगर यांचे प्रतिनिधीत्व दिवाणी दावा क्र.०६/२०१९ मध्ये करत आहेत. रविंद्र ओव्हाळ यांनी वि.दि.दा.क्र.०६/२०१९ मध्ये तडजोड पुरसीसवर ता.१३.०१.२०२२ रोजी सही केलेली आहे.

२. सदरचे दरखास्तीमध्ये अभिजीत शिवाजीराव दुबळ हे शंकर

सहकारी साखर कारखाना लिमीटेडचे प्रतिनिधीत्व करत आहेत. रणजितसिंह मोहिते–पाटील यांनी शंकर सहकारी साखर कारखाना लि. यांच्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत प्रतिनिधीत्व केलेले नाही. हुकूमनामाधारकाने त्याच्या मुळ अर्जात कोठेही कथन केले नाही की, न्यायनिर्णीत ऋणको यांच्याकडे दरखास्तीमधील रक्कम देण्याची साधने आहेत परंतु ते जाणीवपुर्वक सदरची रक्कम देण्यास टाळाटाळ करत आहेत. सदरची रक्कम देण्याची क्षमता न्यायनिर्णीत ऋणको यांची आहे असे कोठेही हुकूमनामाधारकाने कथन केले नाही. त्यामुळे हुकूमनामाधारकाने रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–३७ अन्वये सुरु केलेली कार्यवाही रद्द करणे आवश्यक आहे. म्हणून शेवटी त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जास हुकूमनामाधारकाने जबाब दिला असून त्याने म्हटले आहे की, न्यायनिर्णीत ऋणको यांचा सदरचा अर्ज कायदेशीर नाही. त्याने पुढे म्हटले आहे की, नि.क्र.०९ वर याच न्यायालयाने आदेश पारित केला असून, तो आदेश हे न्यायालय रद्द करु शकत नाही. न्यायनिर्णीत ऋणको यांच्या अर्जातील सर्व मजकूर खोटा व चुकीचा आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

४. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्र.१ बाबत

५. मी न्यायनिर्णीत ऋणकोतर्फे विद्वान वकील श्री.फडे व हुकूमनामाधारकातर्फे विद्वान वकील श्री.भगत यांचा युक्तिवाद ऐकला. न्यायनिर्णीत ऋणकोचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–२२ च्या नोटीसला हरकत उपस्थीत केली आहे. त्या हरकतीवर चौकशी झालेली नाही. तसेच हुकूमनामाधारक व न्यायनिर्णीत ऋणको यांच्यामध्ये जो समझोता झाला होता, त्यावर चेअरमनची सही नाही. हुकूमनामाधारकाने सदरची दरखास्त दाखल केल्यानंतर प्रथम जप्ती वॉरंट काढणे आवश्यक होते. सदरचा हुकूमनामा चेअरमनच्या वैयक्तीक अधिकारात झालेला नाही. त्यामुळे सदरच्या कारखान्याचे चेअरमन श्री.रणजितसिंह मोहिते–पाटील हे न्यायनिर्णीत ऋणको नाहीत. त्यामुळे रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–३७ अन्वयेची कार्यवाही चुकीची असून ती रद्द करणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–४७ अन्वये या न्यायालयास त्यांनी पारित केलेल्या आदेशावर पुनर्विलोकन करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे शेवटी त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. याउलट, हुकूमनामाधारकाचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, या न्यायालयास त्यांचा आदेश पुनर्विलोकन करण्याचा अधिकार नाही. त्याबाबत कायदयात कोणतीही तरतुद नाही. म्हणून शेवटी त्यांनी न्यायनिर्णीत ऋणको यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. मी सदरचे प्रकरणातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. सदरचे प्रकरणातील हुकूमनामा हा रक्कम वसुलीसाठीचा आहे. त्याप्रमाणे हुकूमनामाधारकाने

नि.क्र.९ वर दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–३० प्रमाणे न्यायनिर्णीत ऋणकोच्या वस्तु जप्त करण्यासाठी व न्यायनिर्णीत ऋणकोचे अध्यक्ष श्री.रणजितसिंह मोहिते–पाटील यांना अटक वॉरंट काढून त्यांना दिवाणी तुरुंगात ठेवण्यासाठी अर्ज दिला होता. तो अर्ज न्यायालयाने मंजूर करुन दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–३७ अन्वये नोटीस पाठविण्याबाबतचा आदेश केला आहे. नि.क्र.२३ वर न्यायनिर्णीत ऋणको म्हणून शंकर सहकारी साखर कारखाना लि., सदाशिवनगर तर्फे रणजितसिंह विजयसिंह मोहिते–पाटील यांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे, क्रम–२१, नियम–३७ अन्वये पाठविलेल्या नोटीसची प्रत आहे.

७. सदरच्या परिस्थीतीमध्ये कायद्याची परिस्थीती काय आहे, हे पाहणे उचित होईल. दिवाणी प्रक्रिया संहितेचा, क्रम–४७, नियम–१ असा आहे की,

(१) जी व्यक्ती,–

(अ) ज्या कोणत्याही हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर अपील करण्याची मुभा आहे, परंतु अपील करण्यात आलेले नसेल, अशा हुकूमनाम्यामुळे किंवा आदेशामुळे,

(ब) ज्यावर अपील करण्याची मुभा देण्यात आलेली नसेल, अशा हुकूमनाम्यामुळे किंवा आदेशामुळे, किंवा

(क) लघुवाद न्यायालयाने केलेल्या निर्देशनात देण्यात आलेल्या निर्णयामुळे, स्वतःला व्यथित झालेली समजत असेल आणि जेंव्हा हुकूमनामा किंवा आदेश देण्यात आला त्यावेळी तो तत्परता दाखवून देखील ज्या बाबींची किंवा पुराव्याची माहिती त्या व्यक्तीला मिळविता आली नाही व त्यामुळे जी बाब किंवा पुरावा त्याला हजर करता आला नाही अशी नवीन आणि महत्वाची बाब किंवा पुरावा आढळून आल्यामुळे, अथवा अभिलेखात सकृतदर्शनी

दिसणा–या काही चुकीमुळे किंवा दोषामुळे अथवा इतर कोणत्याही पुरेशा कारणामुळे त्या व्यक्तीची जर अशी इच्छा असेल की, तिच्या विरुध्द देण्यात आलेल्या हुकूमनाम्याचे किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करण्यात यावे, तर अशा व्यक्तिला तो हुकूमनामा किंवा आदेश देणा–या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचे पुनर्विलोकन करण्यात यावे, यासाठी अर्ज करता येईल.

८. तसेच दिवाणी प्रक्रिया संहितेचा, क्रम–२१, नियम–४१ असा आहे की,

[(१)] हुकूमनामा पैशांच्या प्रदानाकरीता असेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारकास

(अ) न्यायनिर्णीत ऋणको, किंवा

(ब) न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम असेल तेव्हा] त्याचा कोणताही अधिकारी, किंवा

(क) अन्य कोणत्याही व्यक्ती,

यांची न्यायनिर्णीत ऋणकोला काही कर्जे फेडावयाची आहेत काय आणि असल्यास कोणती आणि हुकूमनाम्याची पुर्तता करण्यासाठी न्यायनिर्णीत ऋणकोकडे अन्य काही मालमत्ता किंवा साधनसंपत्ती आहे का? आणि असल्यास कोणती? यासंबंधी तोंडी तपासणी करण्यात यावी असा आदेश मिळविण्याकरीता न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि न्यायालय, अशा न्यायनिर्णीत ऋणकोने किंवा अधिक–याने किंवा अन्य व्यक्तीने हजर राहावे व त्याची तपासणी केली जावी याकरीता व कोणत्याही वहया किंवा दस्तऐवज सादर करण्याकरीता आदेश काढू शकेल.

[(२)] पैशांच्या प्रदानाकरीता काढलेल्या हुकूमनाम्याची तीस

दिवसांच्या कालावधीपर्यंत पुर्तता व्हावयाची राहिली असेल, तेव्हा न्यायालय, हुकूमनामाधारकाच्या अर्जावरुन पोटनियम (१) खालील आपल्या शक्तीस बाध न येऊ देता, न्यायनिर्णीत ऋणकोला किंवा न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम असेल तर, त्याच्या कोणत्याही अधिका–याला, त्याने न्यायनिर्णीत ऋणकोच्या भत्त्यांचा तपशिल नमूद करणारे शपथपत्र करुन द्यावे असे फर्मावू शकेल.

(३) पोटनियम (२) खाली काढलेल्या कोणत्याही आदेशाची अवज्ञा झाल्यास, आदेश काढणारे न्यायालय किंवा ज्यांच्याकडे कार्यवाही वर्ग झाली असेल, असे कोणतेही न्यायालय, आदेशाची अवज्ञा करणा–या व्यक्तिला जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत दिवाणी कारागृहात स्थानबध्द करुन ठेवावे असा आदेश देऊ शकेल. मात्र, अशी मुदत संपण्यापूर्वी न्यायालयाने त्या व्यक्तिला मुक्त करण्याचा निर्देश दिला तर गोष्ट वेगळी.]

९. सदरचे प्रकरणातील हुकूमनामा हा शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर यांच्या विरुध्दचा आहे. थोडक्यात सदरच्या साखर कारखान्याविरुध्द सदरचा हुकूमनामा आहे. सदरचा हुकूमनामा हा रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द वैयक्तीक झालेला नाही. रणजितसिंह मोहिते–पाटील हे सदरचे कारखान्याचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे ते न्यायनिर्णीत ऋणको नाहीत. दिवाणी प्रक्रिया संहितामध्ये अशी कोठेही तरतुद नाही की, पैशांच्या प्रदानाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी कारखान्याच्या किंवा निगमच्या कर्मचा–यांना, संचालकांना किंवा जनरल मॅनेजर यांना अटक करुन तुरुंगात ठेवता येईल.

१०. दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–४१ अन्वये ज्यावेळी पैशांच्या प्रदानाचा हुकूमनाम्यातील न्यायनिर्णीत ऋणको हा निगम किंवा संस्था असते त्यावेळी हुकूमनामाधारक हा न्यायालयाकडे अर्ज करुन सदरच्या संस्थेच्या अधिका–यास तोंडी तपासणीसाठी बोलावू शकतो व त्यामध्ये न्यायनिर्णीत ऋणकोला काही कर्ज फेडायची आहेत काय आणि असल्यास कोणती आणि हुकूमनाम्याची पुर्तता करण्यासाठी न्यायनिर्णीत ऋणकोकडे अन्य काही मालमत्ता किंवा साधनसंपती आहे का आणि असल्यास कोणती, याबाबतची माहिती मिळवू शकतो. थोडक्यात रक्कम वसुलीच्या प्रकरणात ज्यावेळी न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम किंवा संस्था असतो त्यावेळी हुकूमनामाधारक हा सदरच्या निगम किंवा संस्थेच्या कर्मचा–यांना किंवा संचालकांना हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी अटक करुन तुरुंगात ठेवण्याची मागणी करु शकत नाही. सदरचे मुद्दयाचे प्रित्यर्थ मी ''धनुष विर सिंग विरुध्द डॉ.इला शर्मा आणि इतर, २०२४ अलाहाबाद उच्च न्यायालय, ११३९३१ **(मा.अलाहाबाद उच्च न्यायालय)'',** या अधिनिर्णयाचा आधार घेत आहे. सदरचे अधिनिर्णयात मा.अलाहाबाद उच्च न्यायालयाने निर्वाळा दिला आहे की, ज्यावेळी पैशांच्या प्रदानाचा हुकूमनामा हा निगम, संस्था किंवा कंपनी यांच्याविरुध्द पारित केलेला असतो त्यावेळी तो कोणत्याही व्यक्तीविरुध्द म्हणजेच कर्मचारी, अधिकारी किंवा संचालक यांच्याविरुध्द त्यांना अटक करुन तुरुंगात ठेवून त्याची अंमलबजावणी करता येत नाही. त्यांच्याविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेचे, क्रम–२१, नियम–३८ अन्वये अटक वॉरंट काढता येत नाही.

११. हुकूमनामाधारक हा सदरच्या वर नमुद केलेल्या व्यक्तिंना अटक वॉरंट काढण्याचे सोडून इतर मार्गाने हुकूमनाम्याची अंमलबजावणी करु शकतो. सदरचे वर नमुद केलेल्या अधिनिर्णयातील प्रमाण सदरचे प्रकरणात लागु होत आहे. रणजितसिंह मोहिते–पाटील हे शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सदाशिवनगर याचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांच्या वैयक्तीक कक्षेत त्यांना अटक वॉरंट काढता येणार

नाही. नि.क्र.०९ मध्ये हुकूमनामाधारकाने न्यायनिर्णीत ऋणकोच्या वस्तु जप्त करुन त्यांची विक्री करुन त्याची रक्कम वसुल होऊन मिळण्याची विनंती केली आहे. तसेच त्यांनी दुसरी विनंती केली आहे की, प्रतिवादीतर्फे चेअरमन रणजितसिंह मोहिते–पाटील यांना अटक वॉरंट काढून त्यांना दिवाणी तुरुगांत ठेवण्यात यावे. सदरच्या मुळ दरखास्तीस न्यायनिर्णीत ऋणकोतर्फे नि.क्र.१३ वर जबाब दिलेला असून त्याने त्यात म्हटले आहे की, हुकूमनामाधारकाने सदरचे दरखास्तीमध्ये वैयक्तीकरित्या न्यायनिर्णीत ऋणकोचे अध्यक्ष यांना सामील केले आहे. त्यामुळे सदरचे प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, कलम–४७ अन्वये प्रथम चौकशी घेण्यात यावी व तोपर्यंत दरखास्तीत नमुद केल्याप्रमाणे कोणतेही आदेश पारित करु नये.

१२. न्यायनिर्णीत ऋणको यांनी नि.क्र.०९ च्या अर्जास नि.क्र.१९ वर जबाब दिलेला आहे. त्यांनी त्यात म्हटले आहे की, सदरचा हुकूमनामा हा पैशांच्या प्रदानाबाबतचा असल्यामुळे तो फक्त कारखान्याच्या विरोधात अंमलबजावणी करुन मागता येईल व तो कारखान्याचे पदाधिकारी यांच्या विरोधात वैयक्तीकपणे मागता येणार नाही. त्यामुळे सदरच्या प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, कलम–४७ अन्वये प्रथम चौकशी घेण्यात यावी व त्याशिवाय नि.क्र.०९ वर आदेश करु नये. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.०९ वर आदेश पारित केला असून दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–३७ अन्वये न्यायनिर्णीत ऋणकोला नोटीस पाठविण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे रणजितसिंह मोहिते–पाटील यांना क्रम–२१, नियम–३७ अन्वयेची नोटीस पाठविण्यात आली आहे. वास्तविक मी वर नमुद केल्याप्रमाणे, रणजितसिंह मोहिते–पाटील हे वैयक्तीकपणे न्यायनिर्णीत ऋणको नाहीत.

१३. मी वर नमुद केल्याप्रमाणे, ज्यावेळी पैशांच्या प्रदानाचा हुकूमनामा हा निगम, संस्था किंवा कंपनी यांच्याविरुध्द पारित केलेला असतो त्यावेळी तो

कोणत्याही व्यक्तीविरुध्द म्हणजेच कर्मचारी, अधिकारी किंवा संचालक यांच्याविरुध्द त्यांना अटक करुन तुरुंगात ठेवून त्याची अंमलबजावणी करता येत नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–४७ अन्वये स्वतः व्यथीत झालेली व्यक्ती ही महत्वाची बाब किंवा पुरावा आढळून आल्यामुळे अथवा अभिलेखात सकृतदर्शनी दिसणा–या काही चुकीमुळे किंवा दोषामुळे अथवा इतर कोणत्याही पुरेशा कारणामुळे तिच्याविरुध्द देण्यात आलेल्या हुकूमनाम्याचे किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करु शकते. थोडक्यात न्यायालय हे पुर्वीच्या आदेशाचे पुनर्विलोकन वर नमुद केलेल्या परिस्थीतीमध्ये करु शकते.

१४. मी वर नमुद केल्याप्रमाणे, नि.क्र.०९ च्या आदेशात न्यायनिर्णीत ऋणकोची संपत्ती जप्त करुन त्याची विक्री करुन आलेली रक्कम हुकूमनामाधारकास देण्याबाबत निर्देश देण्यात आले नाहीत. तसेच रणजितसिंह मोहिते–पाटील हे न्यायनिर्णीत ऋणको आहेत कि नाहीत याबाबतची चौकशी न करता नि.क्र.०९ वर आदेश पारित करण्यात आला आहे. मी वर नमुद केल्याप्रमाणे, न्यायनिर्णीत ऋणको हा सहकारी साखर कारखाना असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–४१ मधील तरतुदीचे पालन न करता न्यायनिर्णीत ऋणकोचे विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–३७ ची कार्यवाही सुरु केली आहे. त्यामुळे सदरच्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यास पुरेसे कारण असल्याचे दिसून येते. मी वर नमुद केलेल्या सर्व कारणामुळे रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–३७ ची जी कार्यवाही सुरु केली आहे ती रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत**

१५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

१० **स्पे.द.क्र.२५/२०२४(नि.क्र.२६ खालील आदेश.)**

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.२६ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.03 15:16:24 +0530

दि.०२.०९.२०२५. (सो.द.घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

माळशिरस.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री.म.पां.सदाफुले. |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माळशिरस. |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | ०२/०९/२०२५. |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | ०२/०९/२०२५. |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | ०२/०९/२०२५. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | ०३/०९/२०२५. |

स्वाक्षरीत/–

दि.०३/०९/२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, माळशिरस.